
तितियो पाठो ।

# तथागत पच्छिमवाचा ।

पालि तिपिटकसाहित्यामध्ये 'दीघनिकाय' ग्रंथाचा समावेश होतो. 'दीघनिकाय' या ग्रंथामध्ये ३४ (चौतीस) सुत्त असून 'महापरिनिब्बाणसुत्त' त्यांपैकीच एक सुत्त आहे. 'तथागत पच्छिमवाचा' हा पाठ त्यामधून घेतलेला आहे.

या पाठामध्ये तथागत, भिक्खू आनंद यांना उद्देशून म्हणतात की, ''आनन्द ! हे वचन होऊन गेलेल्या शास्त्याचे आहे, आता आपले कोणी शास्ता नाहीत असे समजू नका. माझ्यानंतर तुमचे शास्ता धम्म आणि विनय हेच असतील .... .'' अशाप्रकारे या पाठामध्ये माहिती आलेली असून बुद्धकालीन भिक्खू-सङ्घाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यास हा पाठ अत्यंत महत्त्वाचा आहे.



अथ खो भगवा आयस्मन्तं आनन्दं आमन्तेसि - ''सिया यो पनानन्द, तुम्हाकं एवमस्स - 'अतीतसत्थुकं पावचनं, नत्थि नो सत्था' ति । न खो पनेतं, आनन्द, एवं दट्ठब्बं । यो वो आनन्द, मया धम्मो च विनयो च देसितो पञ्ञत्तो, सो वो ममच्चयेन सत्था' ति । यथा खो पनानन्द, एतरहि भिक्खु अञ्ञमञ्ञं आवुसो वादेन समुदाचरन्ति, न खो ममच्चयेन एवं समुदाचरितब्बं । थेरतरेन आनन्द, भिक्खुना नवकतरो भिक्खु नामेन वा गोत्तेन वा आवुसो वादेन वा समुदाचरितब्बो । नवकतरेन भिक्खुना थेरतरो भिक्खु 'भन्ते' ति वा 'आयस्मा' ति वा समुदाचरितब्बो । आकङ्खमानो, आनन्द, सङ्घो ममच्चयेन खुद्दानुखुद्दकानि सिक्खापदानि समूहनतु । अथ खो भगवा भिक्खु आमन्तेसि - 'हन्द दानि भिक्खवे, आमन्तयामि वो - 'वयधम्मा सङ्खारा, अप्पमादेन सम्पादेथा'' ति । अयं तथागतस्स पच्छिमा वाचा ।

*(महापरिनिब्बाणसुत्तं)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**पन** (अव्यय) – आणि, आता, परंतु

**पावचन** (नपुं.) – प्रवचन, बुद्धोपदेश

**विनय** (पुं.) – भिक्खू-जीवनाचे नियम-उपनियम

**पञ्ञत्त** (कृदन्त) – बनविलेले नियम, प्रज्ञप्त केलेली घोषणा, बुद्धिमानता

**समुदाचरण** (नपुं.) – आचरण, अभ्यास, व्यवहार

**थेरतरेन** – स्थविरांच्या व्यतिरिक्त, स्थविरांपेक्षा इतर

**नवकतर** (वि.) – तरुणापेक्षाही तरुण

**आकङ्ख** (क्रिया.) – इच्छा, आकांक्षा करणे

**सङ्घ** (पुं.) – समूह, परिषद, भिक्खुपरिषद

**खुद्दानुखुद्दक** (वि.) – लहान-मोठे

**समूहनति** – (क्रिया.) – मुळापासून उपटून टाकणे

**सङ्खार** (पुं.) – संस्कार

**सत्थु** (पुं.) – शास्ता

**दट्ठब्बो** (क्रिया.) – पाहिले पाहिजे

**देसित** (कृदन्त) – उपदिष्ट, उपदेशिलेले

**ममच्चयेन** – माझ्यानंतर

**अञ्ञमञ्ञ** (वि.) – परस्पर

**थेर** – स्थविर, ज्येष्ठ भिक्खू, जो कमीतकमी दहा वर्षांचा उपसम्पन्न भिक्खू असावा

**भन्ते** (भदन्त) (सम्बोधनरूप) – शेवटच्या श्वासापर्यंत लोकांच्या, जगाच्या संसाराच्या कल्याणाची भावना जोपासणारा

**सिक्खापद** (नपुं.) – शीलसंबंधित नियम, शिक्षापद

**अप्पमाद** (वि.) – अप्रमाद, जागृकता

**सम्पादेति** (क्रिया.) – पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) तथागताने भिक्खू आनंदला काय सांगितले ?

(२) तथागताने भिक्खू आनंदला नवीन भिक्खूसंदर्भात काय सांगितले ?

(३) तथागताची अंतिम वाणी कोणती ?

**२. जोड्या जुळवा.**

| (अ) | (ब) |
|---|---|
| (१) वयधम्मा सङ्खारा | (१) पच्छिमा वाच । |
| (२) अतीत सत्थुकं पावचन | (२) सो वो ममच्चयेन सत्था |
| (३) अयं तथागतस्स | (३) नत्थि नो सत्था' ति । |
| | (४) अप्पमादेन सम्पादेथा' ति । |

**टिपणे**

- निसर्ग व पर्यावरण सांगणे.
- निसर्गाचा अभ्यास करणे.

★★★